महाराष्ट्र शासन

पंचायत विभाग

# राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान पंचायत विभाग जिल्हा परिषद,अमरावती

## अभ्यास दौरा दरपत्रक प्रवास खर्च

## सन २०२३-२४

**कार्यालय: जिल्हा परिषद,अमरावती कँम्प रोड जिल्हा न्यायालयाचे समोर अमरावती पिन कोड-४४४६०२**

**वेबसाईट: https://zpamravati.gov.in**

**ई-मेल: mhdyceo@gmail.com rgpsazpamt@gmail.com**

# राज्याअंतर्गत अभ्यास दौरा दरपत्रक सुचना
## अभ्यास दौरा सेवा-२०२३-२४
## जिल्हा परिषद,अमरावती

| | |
|---|---|
| दरपत्रक सादर करण्याचा कालावधी<br>दिनांक व वेळ | दिनांक- 27, डिसेंबर, 2023 ~~जानेवारी २०२४~~<br>संध्याकाळी ५.०० वाजे पर्यंत |
| दरपत्रक सादर करण्याचा अंतिम<br>दिनांक व वेळ | दिनांक, 02 जानेवारी २०२४<br>संध्याकाळी ४.०० वाजे पर्यंत |
| दरपत्रक उघडण्याचा दिनांक व वेळ | दिनांक, 02 जानेवारी २०२४<br>संध्याकाळी ५.०० वाजता |

**अधिक माहितीसाठी कार्यालयास संपर्क साधावा.**

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रां प)
राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान कक्ष ,पंचायत विभाग
जिल्हा परिषद अमरावती ४४४६०२.

(अविश्यांत पंडा भाप्रसे)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अमरावती**

जाक/जिप/पंवि/RGSA/दरपत्रक सुचना/ 5408. /२०२३-२४
कार्यालय जिल्हा परिषद अमरावती
दि 27 डिसेंबर २०२३

# अभ्यास दौरा आयोजनाकरिता दरपत्रक सादर करणे बाबत नोटीस

राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान सन २०२३-२४ अंतर्गत नागपुर विभागा अंतर्गत चंद्रपुर व गडचिरोली येथे ४ दिवसीय अभ्यास दौरा आयोजित करावयाचा आहे . त्याकरिता खालील नमुद प्रमाणे प्रवास, (2x2), पुश बॅक वाहन इतर अनुषांगिक व्यवस्था पुरविण्याकरिता खालील अटी व शर्तीचे आधिन राहुन इच्छुक पुरवठादार यांचे कडुन २ लिफाफा पध्दतीने दरपत्रक मागविण्यात येत आहे.

➢ **प्रवास-**

- चांगल्या पध्दतीचे वाहणाद्वारे (2x2)पुश बॅक वाहन प्रवास .
- प्रवासादरम्यान टोल व इतर खर्चासह दर सादर करावे.
- २ चालक सह

➢ **इतर अनुषांगिक व्यवस्था-**

- सर्व प्रवासी यांना ४ दिवसाचा अपघात विमा प्रवासाचे २ दिवस आधी तयार करुन घेण्याची जबाबदारी संबधित पुरवठाधारक यांची राहील.
- प्रवासादरम्यान वाहनामध्ये बिघाड झाल्यास तात्काळ दुसरे वाहन उपलब्ध करुन देण्याची जबादारी संबधित पुरवठाधारक यांची राहील .
- प्रवासाकरिता आवश्यक असलेल्या वाहतुक परवाना व इतर परवाने संबधित पुरवठाधारकाने वेळेआधी घेण्याची जबाबदारी संबधित पुरवठाधारक यांची राहील.
- प्रवासादरम्यान होणारा पार्कीग,टोल किंवा इतर चार्जेस अदा करण्याची जबाबदारी संबधित पुरवठाधारक यांची राहील.
- सोबत असणारे वाहन चालक व वाहक यांचे कोविड -१९ लसीकरण पुर्ण झाले बाबतचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

➢ **पहीला लिफाफा – तांत्रिक लिफाफा**

**आवश्यक दस्ताऐवज –**

**१.आवश्यक दस्ताऐवजामध्ये खालील गोष्टीचा समावेश असेल.**

- कंत्राटदाराच्या आर्थिक क्षमते विषयी तपशिल बँकेचे प्रमाणपत्र (किमान ६ महिन्याचे स्टेटमेंट )
- शासकिय विभागात अशा प्रकारे अभ्यास दौरा आयोजित केल्याचे शासकिय विभागाचे प्रमाणपत्र
- वाहण नोंदणी प्रमाणपत्र ,वाहणपरवाणा व विमा व इतर अनुषांगिक प्रमाणपत्रे
- वाहन चालकाचा पुर्ण तपशिल व वाहन चालक परवाणा
- आयकर मागिल २ वर्षाचा ३१ मार्च २०२३ पर्यंत पुर्ण भरलेला चालान/पावती
- पॅन कार्ड ची झेराक्स (फर्म/प्रोपायटर).
- दरपत्रकामध्ये नमुद केलेल्या दरानुसार सर्व व्यवस्था पुरविण्या बाबतचे प्रमाणपत्र कंत्राटदारने निविदेसोबत देणे आवश्यक आहे.
- एकल दरपत्रक सादर केल्याबाबतचे प्रमाणपत्र.

- राष्ट्रीयकृत बॅकेमधील खाते क्रमांक
- प्रवासी वाहतुक सुरक्षा मानक पुर्तेता करिता असल्याबाबतचे प्रमाणपत्र
- चालू स्थितीतील अग्नीशामक सयंत्र ,व First Aid Box वाहनामध्ये उपलब्ध असल्याबाबतचे प्रमाणपत्र

➢ **दुसरा लिफाफा — आर्थिक लिफाफा**

**आर्थिक दरपत्रक**

या मध्ये प्रती वाहन प्रती दिवस भाडे एकुण ४ दिवसाकरिता लागणारे एकुण भाडे सर्व करांसह व टोल व इतर अनुषांगिक खर्चासह सादर करावे .

**आवश्यक सुचना व अटी व शर्ती**

१. सदर दरपत्रकांची प्रक्रिया कुठल्याहीक्षणी , कुठल्याही स्थितीमध्ये ,कुठलेली कारण न देता रद्द करण्याचे अधिकार हे कार्यालय राखुन ठेवत आहे .

२. सदर दौरा हा संभाव्य असुन कुठल्याहीक्षणी ,कुठलेली कारण न देता दौरा रद्द करण्याचे अधिकार हे कार्यालय राखुन ठेवत आहे .

३. प्राप्त दरपत्रकामधुन कुठलेही एक किंवा सर्व दरपत्रक कुठलेली कारण न देता रद्द करण्याचे अधिकार हे कार्यालय राखुन ठेवत आहे .

४. सदर दौ-याकरिता ५० टक्के अग्रिम रक्कम व ५० टक्के दौरा पुर्ण झाल्यानंतर आवश्यक शासकिय कपाती करुन अदा करण्यात येईल .

५. ५० ,५० लोकप्रतिनिधी/कर्मचारी यांचे दोन दौरा नियोजित आहे सदर दौ-याकरिता ५० व्यक्तीमागे ०२ कर्मचारी नियोजनाकरिता सोबत येणार असुन या दोन व्यक्तींचे देयक अदा केल्याजाणार नाही याची जाणिवेसह आपले आपण दरपत्रकसादर करावे.

६. संभाव्य दौरा वेळापत्रक या सुचनेसोबत सादर करण्यात आलेले आहे त्यानुसार आपले दर सादर करावेत संभाव्य वेळापत्रकामध्ये या कार्यालयाकडुन आवश्यकता भासल्यास बदल करण्यात येईल व असा बदल संबधित कंत्राटदारास मान्य करावा लागेल.

७. पुरवठाधारकांची सेवा समाधानकारक न वाटल्यास आवश्यकतेनुसार कपाती करण्याचे अधिकार हे कार्यालय राखुन ठेवत आहे

उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्यास इच्छुक पुरवठादाराने प्रती व्यक्ती प्रती दिवस आपले दर या कार्यालयात दि 02 /१/२०२४ पर्यत सादर करावे .

(अविश्यांत पंडा भाप्रसे)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अमरावती**

**राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान अंतगर्त सन २०२३-२४**
**चंद्रपुर विभागांतर्गत राज्यांतर्गत अभ्यास दौरा प्रवासाचे विवरण**
**(पंचायत विभाग) जिल्हा परिषद,अमरावती**

| अ क्र | तपशिल | दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| १. | दि ९/ १/२०२४ रोजी जि.प.अमरावती येथुन चंद्रपुर करिता प्रस्थान वेळ ११.०० वाजता | ९/०१/२०२४ | |
| २. | चंद्रपुर येथे पोहचणे व मुक्काम | ९/०१/२०२४ | |
| ३. | चंद्रपुर मधील ग्रामपंचायती पाहणी कार्यक्रम<br>१. ग्रां.प. आनंदवन<br>२. ग्रां.प. बिबी<br>३. ग्रां.प. मंगी<br>४. ग्रां.प. राजगड<br>५. ग्रां.प. जुनगाळा<br>६. ग्रां.प. मोहुर्ली | १०/०१/२०२४ | |
| ४ | गडचिरोली कडे प्रस्थान सकाळी ८.०० वाजता<br>१.ग्रां.प.लेखामेंडा ,<br>२.हेमलकसा आश्रम<br>३.अभयबंग ,<br>४.ग्रां.प. अरततुंडी<br>५.ग्रा.प.कसारी | ११/०१/२०२४ | |
| ५. | गडचिरोली मधील ग्रामपंचायत पाहणी व चंद्रपुर कडे परतीचा प्रवास | ११/०१/२०२४ | |
| ६. | चंद्रपुर मुक्कम व चंद्रपुर ते अमरावती परतीचा प्रवास | १२/०१/२०२४ | |

(अविश्यांत पंडा भाप्रसे)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अमरावती**